दा ३
२०१५

RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ३, अंक ८३(५)] शनिवार, जुलै १, २०१७/आषाढ १०, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १९६

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जुलै २०१७

**आदेश**

**महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम.**

क्रमांक इएनटी-२०१७/प्र.क्र. १११/टी-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमाच्या (१९२३ चा १) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे), कलम ३ अन्वये कोणत्याही करमणुकीच्या स्थानात प्रवेश मिळविण्यासाठी द्यावयाच्या रकमेवर करमणूक शुल्क बसविण्यात येऊन राज्य शासनाकडे भरण्यात येतो ;

आणि ज्याअर्थी, पंचायत किंवा नगरपरिषदा किंवा प्रादेशिक परिषद किंवा जिल्हा परिषद यांना करमणुकीवर कर बसवून तो गोळा करण्यास सक्षम करण्याच्या हेतूने संविधान (एकशे एकवी सुधारणा) अधिनियम, २०१६ अन्वये भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील दुसऱ्या यादीमधील (राज्य यादी) नोंद क्रमांक ६२ मध्ये बदल करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त संविधान सुधारणा अधिनियमामुळे महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विषयक कायदे (सुधारणा, विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ४२) अन्वये उक्त अधिनियम सुधारित करण्यात आला आहे, जो करमणूक शुल्क बसविण्याशी संबंधित असलेल्या कलम १३ ते ३१ वगळून, दिनांक १ जुलै, २०१७ पासून अंमलात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने वित्त विभाग, शासन अधिसूचना क्रमांक एमजीएसटी-१०१७/प्र.क्र. १०३(१०), दिनांक २९ जून, २०१७ मधील नोंद क्रमांक ३४ अन्वये, आणि भारत सरकार ने शासन अधिसूचना क्रमांक ११/२०१७ केंद्रीय कर (दर), दिनांक २८ जून, २०१७ मधील नोंद क्रमांक ३४ नुसार लेखाशिर्ष ९९९६ (मनोरंजन, संस्कृती आणि खेळ विषयक सेवा) वर वस्तू व सेवा कर (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त वस्तू व सेवा कर नोंदी" असा करण्यात आला आहे), बसविला आहे ;

आणि ज्याअर्थी, करमणुकीवर वस्तू व सेवा कर बसविण्यात आल्याने उक्त अधिनियमांन्वये बसविण्यात येणाऱ्या करमणूक शुल्क भरण्यापासून सूट देणे योग्य राहील, असे शासनास वाटते.

आता त्याअर्थी, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमाच्या (१९२३ चा १) कलम ६ चे उपकलम (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा आणि याबाबतीत सक्षम असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करून ज्याच्यावर संबंधित वस्तू आणि सेवा कर नोंदी अन्वये वस्तू आणि सेवा कर लागू करण्यात येत आहे, त्यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३ अनुसार बसविण्यात येणारा करमणूक शुल्क भरण्यापासून महाराष्ट्र शासन पुढील आदेशापर्यंत किंवा १५ सप्टेंबर, २०१७, यापैकी जे अगोदर घडेल, तोपर्यंत सूट देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

**डॉ. माधव वीर,**
शासनाचे उप सचिव.